## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०२५/सं.क्र.१४/का.६
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १८/११/२०२५

प्रति,

जिल्हाधिकारी, सर्व
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

**विषयः-** राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायती सार्वत्रिक निवडणूक-२०२५ **नामनिर्देशन स्विकारणेबाबत देण्यात आलेल्या ,** दि. १७/११/२०२५ रोजीचे राज्य निवडणूक आयोगाचे पत्र रद्द करणेबाबत.

**महोदय,**

नोंदणीकृत पक्षाशी संबंधित नामनिर्देशन पत्र स्विकारण्याबाबतचे विषयान्वये देण्यात आलेले दि.१७/११/२०२५ रोजीचे पत्र रद्द करण्यात येत असून खालील प्रमाणे सुधारित सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या वतीने नामनिर्देशन अर्ज सादर केलेल्या डमी उमेदवाराच्या नामनिर्देशन अर्जात एकच सूचक असल्यास छाननी अंती अशा डमी उमेदवाराचा अर्ज बाद करण्यात यावा.

मात्र, त्या डमी उमेदवाराने पाच सूचकांच्या स्वाक्षरी सह नामनिर्देशन अर्ज सादर केला असल्यास सदर डमी उमेदवार इतर कागदपत्रे व अटी शर्तींची पूर्तता करीत असल्यास त्याचा नामनिर्देशन अर्ज “अपक्ष” उमेदवार म्हणून पात्र ठरविण्यात यावा.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेने,

आपला,

( राजेंद्र पाटील )
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र